**नि.फौ.ख.क्र. ९४/२०२५**

**सरकार वि. अमोल मोरे**

**निशाणी क्र.३९**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांचे सत्यप्रतिज्ञेवर कथन.**

| | |
|---|---|
| माझे नाव | – अतुल शिवाजी रासकर, |
| माझे वय | – ३२ वर्षे, व्यवसाय – शेती |
| राहणार | – सासवड, ता.फलटण, जि.सातारा |

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.३ चा सरतपास सरकारी विधीज्ञ श्रीमती एस.एन.वायकर यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

मी सन २०२३ मध्ये शरयु कारखाना येथील राख उचलण्याचे काम मी करीत होतो. दि.०९.१२.२०२३ रोजी माझ्या जे.सी.बी.वरील ड्रायव्हरने कारखान्यावरील राख यार्ड मधून राख भरली. काम संपल्यानंतर २.०० ते ३.०० च्या दरम्यान ड्रायव्हरने जे.सी.बी. बाजूला लावून ठेवलेला होता. त्यावेळी मी तेथे हजर होतो. जे.सी.बी. लावल्यानंतर ड्रायव्हर व मी आपापल्या घरी निघून गेलो. त्याच्या दुस–या दिवशी रविवारचा दिवस असल्याने सुट्टी असल्याने मी कारखान्यावर गेलो नाही. त्यानंतर ११ तारखेला सकाळी १०.३० ते ११.०० च्या दरम्यान मी कारखान्यावर गेलो. राखयार्डमध्ये मला जे.सी.बी. दिसून आला नाही. माझ्या जे.सी.बी.चा क्रमांक एम.एच.२०–ए.वाय. ६२८५ असा होता. सदर जे.सी.बी. चा रंग पिवळा होता. सदरचा जे.सी.बी. मी अमोल कोळेकर यांच्याकडून दि.०३.०७.२०२३ रोजी र.रु.४,३१,०००/– रोखीने देवून विकत घेतला होता. सदर खरेदीबाबत मी नोटरी केली होती. आता मला सदरचा नोटरीचा दस्त दाखवण्यात आला. त्यावर माझी लिहून घेणार म्हणून सही आहे व अमोल कोळेकर यांची लिहून देणार म्हणून सही आहे. सदर दस्तातील मजकूर खरा व बरोबर आहे. मुळ नोटरी दस्ताला **नि.क्र. ४०** देण्यात येत आहे.

२. मी जे.सी.बी.चा त्यानंतर दोन ते तीन दिवस शोध घेतला होता. परंतु, तो मिळून आला नाही. त्यानंतर दि.१५–१६ तारखेला मी लोणंद पोलिस स्टेशनला जे.सी.बी. चोरीला गेल्याबद्दल तक्रार दिली होती. सदर तक्रार ही अज्ञात चोराबाबत

दिली होती. आता मला माझी तक्रार दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ४१** देण्यात येत आहे. छापील एफ.आय.आर यास **नि.क्र. ४२** देण्यात येत आहे.

३. दि.१७.१२.२०२३ रोजी पोलिस पंचनाम्यासाठी कारखाना राखयार्ड परिसर येथे आले होते. सदरचे घटनास्थळ हे मी दाखविले होते. घटनास्थळ पंचनाम्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. पंचनाम्यास यापूर्वी नि.क्र. ३४ देण्यात आला आहे. दि.१८.१२.२०२३ रोजी पोलिसांचा मला फोन आला होता. त्यांनी मला सांगितले की, जे.सी.बी. मशीन सापडले आहे व ओळखीसाठी मला पोलिस स्टेशनला बोलावले होते. मी लोणंद पोलिस स्टेशनला गेलो तेव्हा जे.सी.बी.तेथे लावलेला होता. सदर जे.सी.बी. हा तोच होता. मला पोलिस स्टेशनला समजले की, माझा जे.सी.बी. हा आरोपी व श्रीराम फायनान्स कंपनीच्या लोकांनी संगनमत करुन चोरुन नेला होता. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास मध्यान्हाची वेळ संपेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

**मध्यान्हानंतर आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.पी.पी.जाधव यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)

ता.२९.०८.२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फलटण.

(न्यायालय क्र.३)